या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com


संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | बुधवार ८ मे २०२४ | अंक१४९ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
94036 41482

# गोपीनाथ मुंडे यांच्याकडे माझ्यापेक्षाही जास्त अनुभव होता; पंतप्रधान मोदी



**प्रतिनिधी/बीड**

भाजप नेत्या पंकजा मुंडे यांच्या प्रचाराच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आज बीडमध्ये सभा पार पडली. या सभेत नरेंद्र मोदी यांनी दिवंगत भाजप नेते गोपीनाथ मुंडे यांच्या आठवणींना उजाळा दिला. "मी संत नगद नारायण महाराज संत भगवान बाबा यांना नमन करतो. योगेश्वर देवीला प्रणाम करतो. बीडचे आमचे स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्यासोबत हृदयाचं नातं राहिलेलं आहे. ते नेहमी मला बीड आणि मराठवाड्याच्या विकासासाठी चर्चा करत होते. मी त्यांना भावपूर्ण याद करत आहे. सहकाऱ्यांनो माझं एक दुर्दैव राहिलंय, तुम्ही मला 2014 मध्ये देशसेवेची जबाबदारी दिली तेव्हा मी देशभरातील गोपीनाथ मुंडे यांच्यासारख्या सहकाऱ्यांना निवडून दिल्ली घेऊन गेलो होतो, जेणेकरुन आम्ही एकत्रपणे देशाची सेवा करु. गोपीनाथ मुंडे यांच्याकडे माझ्यापेक्षाही जास्त अनुभव होता. पण माझं हे दुर्दैव राहिलं की, सत्तेत आल्यानंतर थोड्याच दिवसांमध्ये मला माझ्या सहकाऱ्याला गमवावं लागलं", असं नरेंद्र मोदी म्हणाले."या कार्यकाळात मला माझे अनेक सहकारी गमवावे लागले. गोपीनाथ मुंडे, अरुण जेटली, सुषमा स्वराज, मनोहर पर्रीकर. तुम्ही कल्पना करु शकता का, माझे हात जेव्हा आपले गेले तेव्हा माझ्या अडचणी किती वाढल्या असतील? त्यामुळे या सर्व सहकाऱ्यांची मला खूप आठवण येणं, इथे आलो आहे तर स्वभाविकपणे गोपीनाथ मुंडे यांची आठवण येणं, मला ती कमी जाणवते. इथे आल्यावर ते मला जाणावतं", असं नरेंद्र मोदी म्हणाले.नरेंद्र मोदी यांची इंडिया आघाडीवर टीकापंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी इंडिया आघाडीवर सडकून टीका केली. "आज तिसऱ्या टप्प्यातील मतदान संपत आहे. यासोबतच इंडी आघाडीच्या आशाही संपल्या आहेत. पहिल्या टप्प्यात इंडी आघाडी फस्त झाली. दुसऱ्या टप्प्यात उद्धस्त झाली, आणि आज तिसऱ्या टप्प्यात इंडी आघाडीचा कुठे छोटा-मोठा दिवा जळत होता तो सुद्धा विजला आहे", असं नरेंद्र मोदी म्हणाले.

## काँग्रेससोबत नकली शिवसेना, नकली राष्ट्रवादी'

"हा मोदी आहे, तुम्हीसुद्धा जाणता, मी आपल्याला गॅरंटी देतो, जोपर्यंत मोदी जिवंत आहे, दुनियाची कोणतीही ताकद दलित, वंचित, मागस, ओबीसींचं आरक्षण मागे घेऊ शकत नाही ही मोदीची ताकद आहे. आज कोणतीही राष्ट्रवादी ताकद काँग्रेससोबत उरलेली नाही. असली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष भाजपसोबत आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा असली शिवसेना पक्ष भाजपसोबत आहे, आणि काँग्रेससोबत कोण आहे? नकली शिवसेना, नकली राष्ट्रवादी काँग्रेस, आणि हे करत काय आहेत? ते नकली वचन देत आहेत. नकली व्हिडिओ बनवत आहेत", असा घणाघात नरेंद्र मोदींनी केला.

"काँग्रेसची सवय आहे, न काम करा आणि न काम करुद्या. मी गुजरात आणि महाराष्ट्र दरम्यान बुलेट ट्रेनचं काम सुरु केलं. काँग्रेसने आधी त्याची थट्टा केली. मग विरोध केला. जोपर्यंत महाविनाश आघाडीचं सरकार राहीलं तोपर्यंत या लोकांनी काम पुढे होऊ दिलं नाही. आता परत त्यांचं सरकार आलं तर बुलेट ट्रेनचं काम ठप्प करुन देणार. एकीकडे भाजप आपल्या वचननाम्यात बुलेट ट्रेनच्या विस्ताराची बात करत आहे, दुसरीकडे काँग्रेस आणि इंडिया आघाडी बुलेट ट्रेनचा विरोध करत आहे", अशी टीका नरेंद्र मोदींनी केली."आता तुम्ही मला सांगा 21 व्या शतकाच्या भारताला कोणतं सरकार हवं? देशाला या विकास विरोधी लोकांच्या हातात देऊ शकता का? काँग्रेस जिथे आली आहे त्यांनी स्वप्नांचा भंग केला आहे. महाराष्ट्र आणि मराठवाड्याने ते भोग भोगले आहेत. इंडी आघाडीने कधी इथे दुष्काळाच्या परिस्थितीवर लक्ष दिलं नाही. त्यांनी फक्त फिती कापल्या आणि भ्रष्टाचार केलं. 60 वर्षांपासून मराठवाडा जलग्रीड परियोजना ठप्प पडली होती. आज एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणीस आणि अजित पवार यांनी मिळून सिंचन योजनेला मिशन मोडमध्ये पुढे नेत आहेत", असं नरेंद्र मोदी म्हणाले.

# माजलगाव तालुक्यातील कर्मचा-यांनी ईडीसी कर्तव्य प्रमाणपत्र प्राप्त करावे

बीड, दि.7 :- माजलगाव विधानसभा मतदारसंघातील कार्यरत माजलगाव तालुक्यातील अधिकारी, कर्मचारी यांनी त्यांचे निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, गौरव इंगोले यांनी कळविले आहे. माजलगाव विधानसभा मतदार संघातील धारूर, वडवणी या तालुक्यातील ज्यांचे प्रथम प्रशिक्षण झालेले आहे त्यांनी निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र प्राप्त करून घेतले आहे. याप्रमाणे उद्या बुधवार दिनांक 8 मे 2024 रोजी समाज कल्याण मुलींचे वस्तीगृह, केसापूर वसाहत, माजलगाव या ठिकाणाहून सर्व माजलगाव तालुक्यातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी त्यांचे ईडीसी प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यासाठी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी गौरव इंगोले यांनी कळविले आहे.

## बीड विधानसभा मतदारसंघातील कर्मचाऱ्यांनी ईडीसी प्रमाणपत्र तहसील कार्यालयातून प्राप्त करावे

बीड, दि.7 : मतदानापासून आपले कर्मचारी अधिकारी वंचित राहू नये, यासाठी बीड लोकसभा मतदार संघाअंतर्गत बीड विधानसभा मतदारसंघातील अधिकारी/ कर्मचारी यांनी बीड तहसील कार्यालयातून निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याचे सहाय्यक निवडणूक अधिकारी कविता जाधव यांनी कळविले आहे.

बीड विधानसभा मतदार संघांतर्गत कार्यरत अधिकारी, कर्मचारी ज्यांनी प्रथम प्रशिक्षण यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे केले आहे त्या ठिकाणी त्यांनी 12 (अ) अर्ज भरून दिलेले होते. अशा सर्व निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त अधिकारी कर्मचारी यांचे निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्रचे वाटप तहसील कार्यालय बीड येथील पहिल्या मजल्यावर सुरू असून दि. 11 मे 2024 तारखेपर्यंत ईडीसी प्रमाणपत्र करुन घ्यावे, असे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी कविता जाधव यांनी कळविले आहे.

# आज जागतिक आंतरराष्ट्रीय परिचारिका सप्ताहाचे उद्घाटन संपन्न

**प्रतिनिधी/चंद्रपुर**

दिनांक ६मे २०२४ ला जागतिक परिचारिका सप्ताहाचे आयोजन उपजिल्हा रुग्णालय वरोरा येथे करण्यात आले होते.डॉ प्रफुल्ल खूजे वैद्यकीय अधीक्षक यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. मंचावर डॉ खूजे वैद्यकीय अधीक्षक, डॉ गेडाम स्त्री रोग तज्ज्ञ,सौ वंदना विनोद बरडे सह. अधीसेवीका उपस्थित होते. मान्यंवरानी दिपप्रज्वलन करून फ्लॉरेंन्स नाईटिंगेल यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाला डॉ खूजे वैद्यकीय अधीक्षक यांनी शुभेच्छा देवून मार्गदर्शन केले व परिचारिका बद्दल गौरव ऊदगार काढलें. डॉ गेडाम यांनी शुभेच्छा दिल्या व मार्गदर्शन केले.आणी परीचारिका यांच्या कार्याचा गौरव केला.वंदना बरडे यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले व हपत्ताभर वीविध कार्यक्रम व स्पर्धा घेण्यात येणार व फ्लॉरेन्स नाईटिंगेल यांच्या कार्याचा प्रसार व प्रचार त्या निमित्ताने करण्यात येणार याची माहिती दिली.यामध्ये १)दिनांक ७ मे मंगळवार ला वेगवेगळ्या विषयांवर ५ मीनीट वक्तृत्व स्पर्धा २)८ मे ला डिपार्टमेंट प्रेझेंटेशन व रांगोळी स्पर्धा ३) ९ मे ला डायट डिश काम्पीटेशन ४) १० मे ला बॉनर पोस्टर स्पर्धा ५) ११मे ला प्रश्न मंजुषा ६) १२ मे ला स्मरनीका चे प्रकाशन ग्यादरिंग व आनंद मेळावा, बक्षीस वितरण करण्यात येणार आहे.

व्रूशाली देऊडकर यांनी फ्लॉरेन्स नाईटिंगेल यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.सुत्रसंचालंन प्रीयंका दांडेकर अप.यांनी केले व आभारप्रदर्शन प्रदीप गायकवाड अप . यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन सौ वंदना विनोद बरडे अधीसेवीका यांनी केले.व या कार्यक्रमासाठी सौ संगिता नकले परिसेवीका सौ मिना मोगरे अप. व्रुशाली दहेकर अप .कुंदा मडावी यांनी मेहनत घेतली. सर्व परिसेविका,अधिपरीचारीका व कर्मचारी उपस्थित होते.



संपादकीय

# मातीतली माणसं।

..... ग्रामीण भागातील जीवन त्यांचे राहणीमान त्यांची भाषा व त्यांचा भोवती फिरणारा हिरवा गार निसर्ग ही तर खरी एक चालत आलेली परंपरा म्हणावी लागेल. ग्रामीण भागातील काही लेखकांची नाळ या मातीतल्या माणसाशी जुळली आहे असे म्हणावयास वावगे ठरणार नाही. ग्रामीण भागातील लोकांना कधी सुख तर कधी दुःख भोगावे लागते .या दोन बाजूतून ग्रामीण भागाचा माणूस चालत असतो. शक्यतो काही वेळा संघर्षातून निर्माण झालेली भांडणे कशी चव्हाट्यावर येतात हे एक देखणे चित्र आपण नेहमी पाहत आलो आहे. बऱ्याच शेतकऱ्यांची जमीन वीस पंचवीस एकर असते पण भावा भावाचे भांडण एका एका एकरा साठी चाललेले असते. यामुळे मी मोठा का तू मोठा ही एक इर्षा भावा भावांच्या मध्ये लागलेली असते. हे चित्र सध्याचे नाही. यापूर्वीसुद्धा असे आपण पुष्कळ वेळा पाहिले आहे. कोर्टामध्ये दोघांचे भरपूर पैसे जातात पण निकाल लवकर लागत नाहीत. काहींचे वकील केस लढून मरून सुद्धा गेले, पण काहींचा निकाल लागला नाही हीच मोठी खंत आहे.

ग्रामीण भागाचे दुःख आणि दारिद्य हे तर त्यांच्या पाचवीला नेहमी पुजलेले असते. यातून त्यांच्या मुलाबाळांची पोटाची झालेली दैना ही तर खरी पहावत नाही. जन्माला येताना काही माणसे तोंडात सोन्याचा चमचा घेऊन जन्माला येतात. तर काही माणसे दुःख घेऊन येत असतात. दुःख घेऊन येणारी माणसे खरंच ही गरीब असतात. कारण तो माणूस जन्माला येण्याअगोदर तिथे दुःख पहिलीच असतात. नंतर याच दुःखात याचा जन्म होतो. अशा दुःखाच्या लोकांच्या याद्या ग्रामीण भागामध्ये भरपूर आहेत. त्यांचे दुखणे, यामध्ये त्यांची झालेली होरपळ हे सारे दुःख मातीतील माणसे या ग्रामीण कथासंग्रहामध्ये लेखकांने जीव तोडून कळवळून लिहिले आहे.विशेष म्हणजे ग्रामीण भागातील लोकांचे मन धुतल्या तांदळासारखे व खोबऱ्यातील गोड पाण्यासारखे कसे असते याचे उत्तम उदाहरण या ग्रामीण कथासंग्रहामध्ये लिहिले आहे. ग्रामीण भाषेत लेखकाची रंगणारी लेखणी प्रत्यक्ष अनुभव घेऊन आली आहे. एका पेक्षा एक कथा सुंदर अशा लिहिल्या आहेत. यामध्ये बाजाराचे वर्णन असो की दुःखाचे सावट असो, अथवा निसर्गाचे वर्णन असो अतिशय उत्कृष्ट पद्धतीने या कथासंग्रहांमध्ये लिहिले आहे. या लेखकाविषयी थोडे लिहावे वाटते. यांची आणि माझी ओळख अलीकडच्या काळामध्ये झाली आहे. या लेखकाचे नाव आहे तात्याराव पुंजाबा पवार, औरंगाबाद. शिवाय लेखक उत्तम कवीही आहेत. ही एक साहित्यातील जमेची मोठी बाजू आहे.

हा कथासंग्रह वाचल्यानंतर मला अण्णाभाऊ साठे यांची आठवण झाली. अगदी तशीच रांगडी भाषा, पात्राचे वर्णन, निसर्ग देखावा, झाडाच्या फांदीतून उगवलेला सूर्य, लहान गोष्ट मोठी कशी होते, इतका यामध्ये बारकाई पणा दिसून आला आहे. इथून पुढे लेखक तात्याराव पवार आणखी उत्कृष्ट साहित्य निर्मिती करून समाजापुढे येतील अशी मला आशा वाटते, त्यांचा लेखन कार्यास व पुढील लेखनास मी शुभेच्छा देतो. त्याचप्रमाणे हा ग्रामीण कथासंग्रह संग्रही ठेवावा असा आहे.

## पडसावल्या

-: समीक्षा :- 'पडसावल्या' हा कवयित्री प्रतिभा खैरनार ह्यांचा दुसरा कविता संग्रह आहे. हा कविता संग्रह ६ विभागात विभागला आहे. 'नभांगन', 'लेकी बाळी', 'वसुंधरा', 'बाई माणूस', 'पिंपळ पान', 'आयुष्याच्या नोंदी' असे सुलभ वर्गीकरण कवयित्रीने वाचकाला वाचन करण्यासाठी करुन दिलेले दिसून येते. अस्सल ग्रामीण जीवनाचा प्रत्यय वाचकाला त्यांच्या पडसावल्या कविता संग्रहातील कवितांमधून पाहावयास मिळेल 'नभांगण' या पहिल्या भागात 'आभाळ', मायबाप, वड, ओटी, उखळाची खोली, माय माया, सुख दुःखाचा श्रावण, जीवनाचा कलाकार, रखुमाई, सात जन्म, बाप आदी कविता वाचल्यावर वाचक भावविभोर होतो. गहिवरतो. जीवनाच्या सुख दुःखाच्या उन सावल्या पाहून हेलावतो. हेच त्यांच्या कवितांच्या यशाचे मर्म आहे. 'नभांगन' कवितेत कवयित्री प्रतिभा खैरनार म्हणतात - 'इज्जतीची घेऊन मशार्लबाप अनवाणीच पळतो. अन समाजाच्या देव्हाऱ्यात बाप कापरागत जळतो' 'वड' या कवितेत कवयित्रीने माय बापाची महती अतिशय सुंदरपणे वर्णली आहे. आई-बापाच्या मायेचे हे वर्णन वाचकाला गहिवरुन टाकते. माय-बाप कविता ही अशीच आहे. 'बाप' कवितेत कवयित्री प्रतिभा खैरनर म्हणतात - 'बाप बाप म्हणोनिया काय बापावर लिहू बाप अथांग सागर कसे ओंजळीत घेऊ' असे बापाचे मोठेपण या कवितेत कवयित्रीने सांगितलेले आहे. आभाळ, जीवनाचा कलाकार, उखळाची खोली, सुख दुःखाचा श्रावण, सात जन्म या साऱ्या कविता बापाचे जीवनातील महत्व अधोरेखित करणाऱ्या आहेत. कुटुंबासाठी मुला बाळांसाठी, घरासाठी एक बाप किती हाल-अपेष्टा, यातना सहन करतो याचे वर्णन या कवितांमधून कवयित्री प्रतिभा खैरनार यांनी वाचकाला करुन दिले आहे. 'ओटी' ही आई बापावरील कविता अतिशय सुंदर आहे. या कवितेत कवयित्री म्हणते - 'रणरणत्या उन्हाने करपते काळी भुई थेंब घामाचा शिंपुनी तिला भिजवते आई.' 'दे रे देवा पुन्हा जन्म याच माय बापा पोटी परी नको भरु त्यांची पुन्हा गरिबीने ओटी' या ओळी माय-बापाच्या जीवनातील सुख दुःखाचे वास्तव परिस्थितीचे वर्णन करतात. हेच कवयित्री प्रतिभा खैरनार यांच्या काव्याचे कसब आहे. रखु माई, माय माया या कविता ही अशा पठडीतल्या आहेत. लेकीबाळी या दुसऱ्या भागातील कविता लेकीच्या नवख्या रुपाचे सुरेख सुंदर चित्र वाचकापुढे उभ्या करतात. 'लेकी बाळी' या कवितेत कवयित्री म्हणते 'तुझ्या निरागस मुखड्यावरुन जीव ओवाळून टाकावा. काजळाचा नव्हे काळजाचा टिका तुला लावावा. या ओळी माय लेकीवर किती जीवापाड प्रेम करते याचेच द्योतक आहे. लेक म्हणजे आईचा काळजाचा तुकडाच असते. हेत या कवितेतून आपणास दिसून येते. सोन्याचा अंबर, गोड बोरी, चिमणी पाखरं, लेक या साऱ्याकविता लेकीवरील प्रेम, माया, ममता दाखवणाऱ्या आहेत. वसुंधरा या तिसऱ्या भागातील कविता निसर्गाचे वर्णन माय बापा सारखे चिताऱ्या प्रमाणे अतिशय सुंदर निसर्गाच्या उत्कट आविष्काराचे, प्रतिमांचे प्रतिबिंब वाचकाला दर्शवितात. बोरी बाभळींना लेकीची उपमा ही साजेशी अशीच आहे. हेच या कवितांचे खरे यश आहे. वसुंधरा, वनराई, भेगाळली भुई, अवकाळी पाऊस, पान, पाऊस, बैल जोडी, सरिता, काहूर, पावसाच्या सरी, काळी आई, पाऊस अनशाळा, ओली पहाट, चितचोर, श्रावण या साऱ्यानिसर्गाचा उत्कृष्ट अविष्कार जणू आपणास बघावयास मिळत आहे. अशा सुंदर निसर्ग कविता वाचकाला या भागात वाचायला मिळतात. आणि वाचकाला निखळ आनंदाची अनुभूती होते. बाई माणूस या कविता संग्रहातील चौथ्या भागातील कविता अतिशय सुंदर भावणाऱ्या आहेत. बाई माणूस या कवितेत कवयित्री प्रतिभा खैरनार म्हणतात - 'एक उतावीळ आस अशी पोसते हृदयात जशी न्हाती धुती पोरं खेळतेय अंगणात या ओळी बाईपणा आधी जी पोर अल्लड खेळणारी आहे. तिच्या आशा अनेक असतात. त्या पूर्ण व्हाव्यात हीच तिची इच्छा असते. हे दर्शवितात. बाईपणाच्या विविध छटा आपणांस येथे या भागातील 'वयाची दुपार', भूल, अंधारातील चांदण्या, बाई, नार, चंदनाच झाड, कंदील, देह, पंचमी, एकांताचे रान, अलंकार, लिपी, मेक ओव्हर' या साऱ्या कविता जीवनानुभवाचा सुंदर अविष्कार आहेत. कवयित्री प्रतिभा खैरनार यांच्या या कविता कल्पनेची उत्तुंगता गाठतात. पिंपळपान या पाचव्या भागातील कविता निसर्ग रुप प्रेम कविता आहेत. पिंपळपान या कवितेत कवयित्री प्रतिभा खैरनार म्हणतात- कुण्या काळजाच्यापिंजऱ्यात गुंतल मनाच पाखरु प्रेमाच्या आभाळात बागडत जणू एक उनाड लेकरु' ही निसर्ग काव्य कल्पना वाचकाच्या काळजाचा ठाव घेणारी आहे. 'आठव, प्रियकर, दाह, स्पर्श, येल, प्रेम मोल, दोन काठ, मृगजळ, कुंपण, सखा, तो पाऊस, अजुनही या साऱ्या प्रेम कविता अतिशयसुंदर व मनाला भावणाऱ्या आहेत. 'आयुष्याच्या नोंदी' या सहाव्या भागातील कविता ग्रामीण जीवनातील सुख दुःखाचा आणि संस्कृतीचा मागोवा घेणाऱ्या आहेत. माणसाच्या जीवनातील विविध घटनांच्या नोंदी या कवितांमध्ये आपणास सापडतील. संस्कृती परंपररा समाज या साऱ्यांचे प्रतिबिंब या कवितांमध्ये उमटलेले दिसून येईल. 'आयुष्याच्या नोंदी' या कवितेत कवयित्री प्रतिभा खैरनार म्हणतात - ''नव्हते माझे आभाळ कधी अन नव्हती पाया खालची माती पाला पाचोळा या जन्माचा उडत राहिला वाऱ्यावरती'' या ओळी सरत जाणाऱ्या जीवनाचा संदर्भा देतात. 'कविते तुझ्यामुळे' याकवितेत कवयित्री म्हणते - 'माय कविते तुझ्यामुळे झाले आयुष्याचे सोने चिमणीच्या चोचीमधी भरलेले चार दाणे..' व'शब्द शब्दांच्या वारीमध्ये पांडुरंगा तुझे गुणगान... श्वास श्वासात भिनलेले भगवंता तुझे गोड गाणं' या कवितेच्या ओळी वाचकाला भारावून टाकणाऱ्या आहेत. तसेच अंगाई, अंधारातील काजवे.., वेडी आस, कविता, जात राख, माय मराठी, आयुष्याचा पट, पंढरी, वेदना, मैत्री, मोहरा, गाऱ्हाणे, कुस, तळ, येरझारा, माझा गांव, भक्तीची वारी, सोस, स्वप्न, मृत्यो... या साऱ्याच कविता वाचकाला वेगळीच अनुभूती करुन देतात. वाचक या कविता वाचून एका वेगळ्या काव्यविश्वात रमून जातो. हेच या कविता संग्रहाचे वैशिष्ट्य आहे. या कवितेच्या पडसावल्या पाहून पुनः पुन्हा कवितेच्या तेज किरणांचे आपणास वास्तव स्वरुपात दर्शन व्हावे अशी इच्छा प्रगट करत राहतो ]

# श्री वैद्यनाथ देवस्थानने मंडप उपलब्ध न केल्याने भाविकांची गैरसोय-अभयकुमार ठक्कर

## ऐन उन्हाळ्यात वैद्यनाथ मंदिर प्रशासनाचा नियोजनशून्य कारभार !

**परळी प्रतिनिधी**

एप्रिल संपला आता मे महिना चालू झाला असून उन्हाचा पारा ४० अंशांपर्यंत पोचला आहे. उन्हाचे चटके भाविकांना मोठ्या प्रमाणात बसत असून श्री वैद्यनाथ मंदिर प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभारामुळे श्री वैद्यनाथ मंदिरात भाविकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. मंदिर परिसरात भाविकांना उन्हापासून संरक्षण करण्यासाठी मंडप उभारणी करण्यात यावी अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते तथा माजी नगराध्यक्ष श्री अभयकुमार उर्फ पप्पू ठक्कर यांनी केली असून लवकरात लवकर मंडप उभारणी करून भाविकांची होणारी पायपोळ थांबवावी अन्यथा शिवसेना स्टाईलने



आंदोलन करण्यात येईल असा इशाराही त्यांनी दिला आहे.

याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, यंदा हे महिना उजाडला, तरीही वैद्यनाथ देवस्थान कमिटीकडून अद्याप मंडप उभारण्यात आलेला नाही. यामुळे भाविकांना मंदिर परिसरात उन्हाचा त्रास सहन करावा लागत आहे. सकाळी ९ पासूनच उन्हाचे चटके बसण्यास प्रारंभ होतो. त्यामुळे मंदिर परिसरात भाविकांच्या पायांना चटके बसू नयेत म्हणून फरशांना पांढऱ्या रंगाचा कोट मारणे अपेक्षित आहे, तेही करण्यात आलेले नाही. सध्या उन्हाळी सुट्टी असल्याने १२ ज्योतिर्लिंगापैकी एक असलेले पंचम ज्योतिर्लिंग श्री वैद्यनाथाच्या दर्शनासाठी देशभरातून भाविक भक्त मंदिरात येतात. या भाविकांना उन्हापासून संरक्षण देणारी कोणतीही व्यवस्था मंदिर प्रशासनाने केलेली नाही. मंदिर परिसरात जागोजागी पाणपोई करणे अपेक्षित असतांना ती नसल्याने भाविकांनी पाणी विकतच घेऊन प्यावे लागत आहे. यात भाविकांची मोठ्या प्रमाणात लूट होत असल्याचेही अभयकुमार ठक्कर यांनी म्हटले आहे.

# क्रांती असंघटित महिला कामगार युनियनचा वंचितचे अशोक हिंगे यांना पाठिंबा

## देशाला महागाईच्या खाईत लोटणा-या मोदींना सत्तेपासून दूर ठेवण्याचा महिलांचा निर्धार

बीड (प्रतिनिधी) बीड लोकसभेची रणधुमाळी जोरात चालू असून वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी गेवराई तालुक्यात क्रांती असंघटित महिला कामगार युनियनच्या अभिवचन सभेचे आयोजन केले होते. यावेळी असंख्य महिलांची उपस्थिती होत्या , या संघटनेने अशोक हिंगे पाटील यांना जाहीर पाठिंबा दिला आहे.

गॅस सिलेंडर सह अनेक वस्तूंची महागाई करणाऱ्या नरेंद्र मोदी यांना सत्तेपासून दूर ठेवण्याचा निर्धार उपस्थित क्रांती असंघटित महिला कामगार युनियन यांच्या अध्यक्ष शाहीन पठाण, मराठवाडा अध्यक्ष मंगल राठोड, बीड जिल्हा अध्यक्ष कविताताई डोंगरे, राज्य संघटक शकुंतला घुंगासे, गेवराई तालुका अध्यक्ष मनीषा शरणांगत, रोहिणी राऊत, मंदाताई चौधरी, शितल गहिरे, आकांक्षा घाटूळ यांच्यासह तालुक्यातील महिलांनी व्यक्त केला


बीड लोकसभेची रण धुमाळी अंतिम टप्प्यात आली असून प्रत्येक उमेदवाराने आपला हायटेक प्रचार करून मतदारापर्यंत पोहोचण्याचे काम चालू केले आहे. त्याप्रमाणे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी गेवराई तालुक्यात महिलांसाठीची अभिवचन सभा आयोजित केली होती. यावेळी सभेसाठी हजारो महिलांची उपस्थिती होती. महिला ही घर चालवणारी गृहिणी आहे घर चालवताना महिलांना अनेक आर्थिक अडचणीचा सामना करावा लागतो. सरकारमधील मोदी सरकारने महागाई वाढवून गोरगरिबांचे जीवन जगणे मुश्किल केले आहे. घटने बाबतही केंद्रातील भाजप पुरस्कृत सरकारची वक्रदृष्टी आहे. मुझे कतई आरक्षण मंजूर नही असे म्हणणाऱ्या मोदी सरकार विरोधात जनतेत तीव्र नाराजी आहे. अशा घटनाविरोधी सरकारला आणि महागाईच्या खाईत लोटणाऱ्या मोदींना सत्तेत राहण्याचा काहीच अधिकार नाही असे म्हणत महिलांनी आम्ही गोरगरीब जनता आहोत, आम्हाला आमचा संसार चालवण्यासाठी विविध प्रकारची कामे करून उपजीविका भागवावी लागते. ही बाबा अद्याप पर्यंत मोदी सरकारच्या लक्षात येत नाही, मात्र गोरगरीब दिन दलित दुबळ्यांच्या पाठीशी असणाऱ्या वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष एडवोकेट प्रकाश आंबेडकर सतत उभे असतात. माझा गरीब माणूस स्वाभिमानाने जगला पाहिजे. त्याला मान सन्मान मिळाला पाहिजे. या गोष्टीसाठी सतत संघर्षशील असलेले अँड.प्रकाश आंबेडकर यांचे हात बळकट करण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे




पाटील यांना बीड लोकसभा मतदारसंघातून प्रचंड मताधिक्याने निवडून आणूच असे मत अभिवचन सभेत क्रांती असंघटित महिला कामगार युनियनचे अध्यक्ष शाहीन पठाण यांनी व्यक्त केले. आम्ही ना महायुती ना महा विकास आम्हाला आता हवी बहुजन वंचित आघाडी असा निर्धार महिलांनी व्यक्त केला या वेळी हजारो महिला उपस्थित होत्या.यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका अध्यक्ष पप्पु गायकवाड यांनी केले तर सुत्रसंचलन तालुका महासचिव किशोर भोले यांनी केले यावेळी किशोर चव्हाण राहुल सोनवणे कृष्णा हातागळे राहुल कोकाटे सचिन खांडेकर नितीन पवार सचिन वाव्हळ उपस्थित होते.

## शेकडो वर्षापुर्वीचे वटवृक्ष नामशेष होण्याच्या मार्गावर; वटवृक्षावर बागडणा-या पक्षांचा किलबिलाट झालाय दुर्ल ; वृक्षसंवर्धनाची आवश्यकता:- डॉ.गणेश ढवळे

बीड:- निसर्गाचा समतोल राहण्यासाठी वृक्षसंगोपण जितकं गरजेचं आहे तितकंच त्या वृक्षांची देखभाल करून वृक्ष संगोपण सुद्धा गरजेचं आहे तरच हवामानात होत असलेला बदल व दुष्परिणाम कमी होण्यास मदत होणार आहे यासाठी सर्वांनी राष्ट्रीय कर्तव्य समजुन नैतिक जबाबदारी पार पाडायला हवी.रस्ते विकासाच्या कामात शेकडो वर्षापुर्वीच्या वृक्षांची कत्तल करण्यात आली त्या बदल्यात रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवड करण्याचे बंधन असताना कागदोपत्री वृक्षलागवड झाल्याचे दिसून येत आहे तर शासनाच्या कोट्यवधीं वृक्षलागवड मोहीम दिशाभूल करणारी फसवी असल्याचे निदर्शनास आले आहे. झाडाची मुळे ही निसर्गाची बिनाखर्चाची पाईपलाइन ; किमान एक वटवृक्ष लावावा एक वटवृक्ष एका हंगामात १ कोटी लिटर पाणी जमिनीत घेऊन जातो तेही पन्नास फुटांच्या खाली पाषाणालाही भेदुन ८०० ते १००० फुटावर पोहचतात.१ कोटी लिटर म्हणजे एका सर्वसाधारण घरगुती विहिरीचा शंभर वेळा उपसा करावा एवढं पाणी याचा गणितीय हिशोब सांगायचा झाला तर ३५ एकर शेतीचे रब्बी हंगामाचे भरणपोषण होते आणि वर्षभर बागायतीसाठी १५ एकरला पुरेल एवढे जिवंत साठ्याचे पाणी एक वड किंवा पिंपळ पुरवतो.म्हणुन आपल्या शेताच्या शेजारी मोकळी पडीक जागा असेल तर किमान एक असा वटवृक्ष लावणे गरजेचे आहे.



वटवृक्षावर बागडणा-या पक्षांचा किलबिलाट झालाय दुर्लभ - - -

विशाल महाकाय वटवृक्ष नामशेष होत असल्याने त्यावर बागडणारे पक्षीही नामशेष होत आहेत.घुबड,कावळे,घार, गिधाड,कबुतर,चिमण्या,पारवे, पोपट, बुलबुल आदि वडफळांवर ताव मारण्यासाठी झाडांवर खेट्या मारताना दिसतात.वडाची बारीक बारीक फळे हे पक्षांचे अन्न आहे त्यामुळे त्यांचे अस्तित्व या झाडांवर अवलंबून आहे. तृयांच्या विष्ठेतून बाहेर पडणाऱ्या बियांमुळे परागी भवनाचे काम होते.झाडांच्या बिया अन्य ठिकाणी रूजुन पर्यावरण संवर्धनास मदत होते.परिसरात वडाच्या झाडाचे अस्तित्व असणे हे त्या परीसरात पर्यावरण समतोल असल्याचे द्योतक आहे.वडाच्या पारंब्या जमिनीत रूजुन नविन झाड तयार होते. मात्र हल्ली वटवृक्ष नामक्षेष होण्याच्या मार्गावर असल्याने वटवृक्षावर बागडणा-या पक्ष्यांचा किलबिलाट आता दुर्लभ झालाय.

रस्ते विकासाच्या नावाखाली शेकडो वर्षापुर्वीच्या वटवृक्षांची कत्तल; वृक्षलागवड मोहीम कागदावरच:- डॉ.गणेश ढवळे

बीड जिल्ह्यातील धुळे ते सोलापूर, अहमदपूर ते अहमदनगर तसेच बीड अहमदनगर,बीड ते परळी राष्ट्रीय महामार्ग आणि राज्यमार्ग रस्ते रूंदीकरण कामांसाठी शेकडो वर्षे वय असलेल्या मोठमोठ्या वृक्षांची अक्षरक्ष: कत्तल करण्यात आली.त्या बदल्यात रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवड करणे बंधनकारक असताना काही ठिकाणी कागदोपत्रीच तर काही ठिकाणी झुडुपांची लागवड करण्यात आली.मराठवाड्यात रस्ते विकास कामात निसर्ग आणि वृक्षसंपदेची मोठी हानी झाली. शासनाकडुन २०१८ मध्ये १३ कोटी आणि २०१९ मध्ये ३३ कोटी वृक्षलागवडीची मोहीम राबविण्यात आली मात्र त्यात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याने मराठवाड्यात झाडे दिसुन येत नसुन वाळवंट होण्याच्या मार्गावर असताना शासनकर्ते याकडे जाणीवपूर्वक कानाडोळा करत आहेत तर ज्यांची जबाबदारी आहे ते वनविभागच भ्रष्टाचारामुळे गोत्यात आलं आहे. याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

## लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातील अकरा मतदारसंघात

### सायंकाळी 5 वाजेपर्यंत सरासरी 53.40 टक्के मतदान

मुंबई, दि. ७ : राज्यातील लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातील मतदान सुरू असून अकरा मतदार संघात सायंकाळी ५ वाजेपर्यंत सरासरी ५३.४० टक्के मतदान झाले आहे.

तिसऱ्या टप्प्यातील एकूण ११ लोकसभा मतदारसंघनिहाय मतदानाची टक्केवारी पुढीलप्रमाणे :-

लातूर - ५५.३८ टक्के
सांगली - ५२.५६ टक्के
बारामती - ४५.६८ टक्के
हातकणंगले - ६२.१८ टक्के
कोल्हापूर - ६३.७१ टक्के
माढा - ५०.०० टक्के
उस्मानाबाद - ५२.७८ टक्के
रायगड - ५०.३१ टक्के
रत्नागिरी -सिंधुदूर्ग- ५३.७५ टक्के
सातारा - ५४.११ टक्के
सोलापूर - ४९.१७ टक्के



संभाजी ब्रिगेड तालुका उपअध्यक्ष बीड मा. राजेश बनकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना संभाजी ब्रिगेड कार्यकर्ते...

# नाथापूर येथे चार ठिकाणी चोरी घटना

बीड **प्रतिनिधी**

दि . ०५/०५/२०२४ रोजी बीड तालुक्यातील नाथापूर येथील शनिवारी रात्री तीनच्या सुमारास चार ठिकाणी चोरीच्या घटना घडल्या आहेत यामुळे नाथा पूर् परिसरात नागरिकात भीतीची वातावरण तयार झाले आहे उन्हाळ्याची दिवस असल्यामुळे ग्रामीण भागातील लोक गच्चीवर किंवा घराच्या समोर गर्मीमुळे झोपलेले असतात याचाच फायदा चोरट्यांनी घेतला आहे शनिवारी रात्री तीनच्या सुमारास सचिन चव्हाण राहणार नाथापूर यांच्या घरी चोरी होऊन मंगळसूत्र चोरट्याने चोरून नेले तसेच दुसरी घटना सचिन मारोतराव काळे यांच्या घरी सोन्याचे गंठण बारा ग्रॅम ची चोरी झाली व साधारण किंमत ४० हजार रुपये आहे तसेच दुसरी घटना मच्छिंद्र महादेव देवडकर यांचे रुपये वीस हजार चोरट्याने नेले तसेच गावातील ज्ञानेश्वर जोशी यांच्याही घरी चोरीचा प्रकार घडला आहे काल आठवडी बाजार असल्यामुळे जो तो आपल्या धावपळीत असतो कोणाला नवीन माणूस आलेला लक्षात येत नाही याचाच फायदा चोरट्याने घेऊन कुठे चोरी कशी करायची हे दिवसभर आठवडी बाजारामुळे पाळत ठेवून चोरीचा प्रकार घडला. नाथापूर मध्ये आज पर्यंत जो काही चोरीचा प्रकार घडत आहे त्याचा शोध आतापर्यंत काही लागला नाही कारण या चोरीमध्ये सीसीटीव्ही मध्ये चोर दिसत आहेत तरी या चोरीचा शोध लागणे हे महत्त्वाचे आहे कारण नेमके चोरी करणारे कोण आहेत. हे सापडतील व नागरिकाच्या मनातील भीती कमी होईल चोर नाही सापडले तर भीती जास्त वाढेल आणि चोरांची डेरिंग होईल तरी पिंपळनेर पोलीस स्टेशन ने चोरीचा शोध लावावा. अशी नाथापूर नागरिकांची व परिसरातील नागरिकांची मागणी आहे. एवढा मोठा बाजार असताना कोणीही पोलीस कर्मचारी आठवडे बाजारात फिरकत नाहीत यामुळे आठवडी बाजारातली महिलांचे मंगळसूत्रे मोबाईल खिशातील पाकीट अश्या चोरीच्या घटना लहान मोठ्या घडतच असतात त्याला जबाबदार कोण आहे याची नोंद पोलिसांनी घेण्याची गरज आहे आठवडी बाजारात फक्त रिक्षा जीप वाले अडवायचे आणि त्यांना त्रास देण्याचे काम करायचे त्याच्या पलीकडे आठवडी बाजारात कुठलेही नियोजन नसते यामुळे चोरांचे मनोबल वाढले आहे.

दैनिक
# लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ






# मोदींनी अंबाजोगाईत धर्माचे राजकारण केले- बजरंग सोनवणे

भाजप जेव्हा हरायला लागते तेव्हा धर्माची ढाल करते आणि शेवटी तो प्रयत्न माझ्या जिल्ह्यात झाला मात्र भाजपला पराभव चुकणार नाही आता द्वेषाचे राजकारण खूप झाले मोदी आले आणि त्यांनी कुठलेही आश्वासन दिले नाही .उलट आरक्षण न देण्याची आणि मुस्लिम द्वेषाची पेरणी करत बीड मधील व देशातील अल्पसंख्याक समुदायाच्या भावना दुखवल्या आहेत . भाजपने धर्मांध राजकारन बंद करावे बीड फुले शाहू आंबेडकर विचाराचा आहे त्यामुळे भाजप नैतिक पातळीवर हारली असून आता केवळ मतदान आणि निकालाची औपचारीकता मागे असल्याचे बजरंग सोनवणे यांनी म्हटले .

अंबाजोगाई येथील सभेत मोदी काय म्हटले तर त्यांचे भाषण होते सर्व मुस्लिम द्वेषी ,भीती वाढवून मते मिळवण्याचा केविलवाणा प्रयत्न केला आहे . इंडिया आघाडीचा एकच अजेंडा आहे ,सरकार मध्ये आल्यावर वर मिशन कॅन्सल चालविणार, आर्टिकल ३७० संपुष्टात येईल, सीएए , एनआरसी कायदा संपुष्टात येईल,तीन तलाक संपविणार इंडिया आघाडी, किसान सन्मान निधी पैसे कॅन्सल करतील,मोफत अन्नधान्य संपविणार देशातील ५५ करोड लोकांना ५ लाखा पर्यत मोफत आरोग्य सेवा संपुष्टात येईल.कॉंग्रेस सरकार इंडिया आघाडी राम मंदिर सुद्धा संपविणार सत्तेत आल्यावर महाराष्ट्र मधील कॉंग्रेस चा मुख्य नेता पंचवीस वर्ष कॉंग्रेस मध्ये राहून आलेला अस भाजप मध्ये आल्यावर बोलला,राहुल गांधी ज्यांचा मोदी ने भाषणात शहजादा म्हणून उल्लेख केला ते सुप्रीम कोर्ट मधून राम मंदिरचा निकाल बदलतेल ,तीन तलाक,शहा बानो केस मध्ये सुप्रीम कोर्टाचा निर्णय बदलला होता. असच राम मंदिरच्या निर्णयाला पलटून टाकतील इंडिया आघाडीच्या नेत्याने सांगितले आहे राम मंदिर बेक्कार आहे . म्हणून हाच नेता राम मंदिरच्या पूजेला पाखंड म्हणत आहे.असले वक्तव्य स्वप्नात सुद्धा बोलू शकले नसते,पण दृष्टी साठी,वोट बँक साठी हे आज असले वक्तव्य करत आहे.वारंवार राम चा प्रभू श्रीराम चा अपमान करत आहे. असले लोक महाराष्ट्र च्या गौरव कसे वाढवणार. इंडिया आघाडीचे लोक वोट जिहाद साठी २६ /११ च्या हल्ल्यातील लोकाना किलीन चिट देणार आहे.कसाब सोबत १० जण येणारे आतंकवादी त्यांना कॉंग्रेस पाठबळ देत आहे. देश विचारणार कॉंगेस च्या लोकांना कॉंग्रेस आणि आतंकवाद यह रिश्ता क्या कहलाता है...दिल्ली मध्ये झालेल्या बाटला हाऊस च्या हल्ल्यात कॉंग्रेसची मोठे नेता रडत बसली होती मोदी चट्टान सारखा(पहाड) तुमच्या समोर उभा आहे राहुल गांधी एक चाल खेळत आहे.आदिवासी मागास लोकांचे आरक्षण सकावून घेऊन धर्माच्या नावावर आरक्षण देणार आहे.कर्नाटकात काय केलंय ओबीसीला रात्रीतून आरक्षण दिलंयकर्नाटक मधील सर्व मुस्लिमाना रात्रीतून ओबीसी कॉंग्रेस ने केले ओबीसी समुद्राय यांना २७% आरक्षण बाबासाहेब यांनी दिल होतभारताच्या संविधान यांनी दिल होत,संसद ने दिल होत कॉंग्रेसने कर्नाटक मधील मुस्लिमाना ओबीसी केले,ओबीसी च्या आरक्षण मध्ये डाका टाकून चोरी करून मुस्लिमांना आरक्षण दिलंयह्याचा सर्वात मोठा वाटा मुसलमान यांना गेला आहे.कॉंग्रेस ने जे कर्नाटक मध्ये केलंय असा खेळ तुम्हाला आवडणार आहे का...? असे म्हणत मुस्लिम द्वेष समोर आला आहे . पाठीमागच्या वाटेने दिलेले मुसलमान याना दिलेले आरक्षण तुम्हाला मंजूर आहे का..?हे अस पूर्ण राज्यात आणि देशात करणार आहे. इंडिया आघाडीच्या नेते पूर्ण पणे मुस्लिम आरक्षण देणार आहे.एस सी , एस टी , ओबीसीचे आरक्षण काढून सर्व मुस्लीम यांना देणार आहे. दलित ,आदिवासी साठी धोक्याची घंटा आहे. सरकार मध्ये आल्यावर हे बुलेट ट्रेन प्रोजेक्ट बंद करतेन. हे भाषण पाहता मोदींनी सलोखा धोक्यात आणल्याचे माझे मत तयार झाले असून यामुळे आता भाजपचा पराभव ही सामूहिक जबाबदारी बनले आहे . मी केवळ निमित्त ही जनतेची लढाई असल्याचे बजरंग सोनवणे यांनी म्हटले आहे.

# एक दिवस देशासाठी; सर्व कामे मागे ठेवून मतदानाचा हक्क बजवावा

## १०० टक्के मतदान करण्याचे तंज़ीम तरक्की उर्दुचे अध्यक्ष हसीन अख्तर यांचे आवाहन

(बीड प्रतिनिधी) लोकशाहीत मतदान हा आपला महत्त्वाचा हक्क, अधिकार आहे. त्यामुळे मिळालेल्या या अधिकाराचा वापर प्रत्येक भारतीय नागरिकाने प्राधान्याने करावा आणि मतदानाचे कर्तव्य पार पाडावे. आपल्या देशाने लोकशाही स्वीकारली, आपण ती अजूनही टिकवून ठेवली आहे. लोकशाहीने अनेक सुविधा, अधिकार, हक्क आपल्याला मिळतात नंतर कोणावर बोटं मोडत न बसता योग्य आणि देशाला पुढे घेऊन जाणारे शासन आणि आपला प्रतिनिधी निवडण्याची ही संधी चुकू न देता सर्व कामे मागे ठेवून एक दिवस देशासाठी देत एकही मत न चुकता शंभर टक्के मतदान करण्याचे आवाहन तंज़ीम तरक्की उर्दुचे अध्यक्ष सय्यद हसीन अख्तर यांनी केले. एकवेळ भारतात राजेशाही व नंतर इंग्रजांची हुकूमशाही होती. तेव्हा राजाच्या पोटी राजा हुकूमशहाच्या पोटी हुकुमशहा जन्माला यायचा परंतु आपण लोकशाही स्वीकारली असून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानाने मतदान हा महत्त्वाचा हक्क, अधिकार आपल्याला मिळाला. यामुळे आता मत पेटीतून आपण दिलेल्या मताच्या कौल वरुन लोकप्रतिनिधी निवडून येतो. यामुळे मिळालेल्या या अधिकाराचा वापर प्रत्येक भारतीय नागरिकाने प्राधान्याने करावा आणि मतदानाचे कर्तव्य पार पाडावे. लोकशाहीने अनेक सुविधा, अधिकार, हक्क आपल्याला दिले आहेत. दर पाच वर्षांनी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत मतदारांनी बजाविलेल्या मतदानाच्या अधिकारातून केंद्रात शासन स्थापन होते. येथे चांगली माणसे, चांगली राज्यकर्ते असावेत, असे एक सुजाण नागरिक म्हणून आपल्याला वाटत असेल तर कोणतीही सबब न सांगता अथवा कोणतेही आमिष, प्रलोभन, भीतीला किंवा जाती-पातीच्या मुद्याला बळी न पडता प्रत्येकाने मतदान करावे. चांगले राज्यकर्ते निवडून येण्यासाठी आपल्या प्रत्येकाचे एकेक मत महत्त्वाचे आहे. आपल्या देशाला एकसंघ ठेवून विकसीत मार्गावर घेऊन जाणारे शासन आणि प्रतिनिधी निवडून देण्याची नामी संधी देशाच्या संविधानाने मिळालेली आहे. या संधीचे सोने करत आपल्या शेजारी, संपर्कातील, नातेवाईक, मित्र या सर्वांना मतदानासाठी घेऊन जाऊन आपणही मतदानाचा हक्क बजवावा देशाला विकास, शांती, एकता, बंधुभावाच्या मार्गावर घेऊन जाणारे आपले प्रतिनिधी देशाच्या सार्वभौमत्व सभागृहात पाठवावे असे आवाहन तंज़ीम तरक्की ऊर्दूचे जिल्हाध्यक्ष सय्यद हसीन अख्तर, सचिव डॉ. सिराजखान आरजु , कोषाध्यक्ष डॉ. नासेर बागवान यांनी केले आहे.


## पैशासाठी विवाहितेचा छळ; सात जणांवर गुन्हा दाखल

गंगापूर : ट्रॅक्टर घेण्यासाठी माहेरून ५ लाख रुपये घेऊन ये, म्हणत विवाहितेचा मानसिक छळ करण्यात आला. याप्रकरणी सासरच्या सात जणांविरोधात गंगापूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. याविषयी पीडित विवाहिता हीना मुस्ताक शेख (वय ३०, रा. लाडगाव, ता. वैजापूर) यांनी दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे की, सासरच्या मंडळींनी तिच्या चारित्र्यावर संशय घेतला. तसेच ट्रॅक्टर घेण्याकरिता माहेरून ५ लाख रुपये घेऊन ये, असे म्हणून शारीरिक व मानसिक छळ केला. मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. तिच्या फिर्यादीवरून आरोपी मुस्ताक हबीब शेख, अनिशा मुक्तार शेख, मुक्तार हबीब शेख (सर्व रा. लाडगाव), छगीर नाजोद्दीन शेख (रा. श्रीरामपूर), अफसाना सलीम शेख, सलीम दादा शेख (रा. नायगाव, ता.जि. छत्रपती संभाजीनगर) यांच्या विरोधात गंगापूर पोलिसांत शनिवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोह. मनोज घोडके करीत आहेत.

# गंगापूर वैजापूर तालुक्यातील जनतेने मतदानावर बहिष्कार टाकण्याचा दिला इशारा

**प्रतिनिधी**
**सुनिल झिंजूर्डे पाटील**

दुष्काळी परिस्थितीमुळे यंदा गंगापूर वैजापूर तालुक्यात पिण्याच्या पाण्याची भयंकर समस्या निर्माण झाली असून मतदानाच्या तारखेच्या आत नांदूर मधमेश्वर कालव्यातून पिण्याच्या पाण्यासाठी तात्काळ हक्काचेआवर्तन न सोडल्यास कालवा पट्ट्यातील अनेक गावातील ग्रामस्थांनी 13 तारखेच्या लोकसभा निवडणुकीच्या मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. यंदा पर्जन्यमान कमी झाल्यामुळे पाणी पातळी खोलवर गेली आहे अनेक विहिरींनी तळ गाठला आहे त्यामुळे ग्रामीण भागात सध्या तीव्र पाणीटंचाई सुरू झालेली आहे गंगापूर व वैजापूर तालुक्यात जवळपास



तीनशे पेक्षा जास्त टँकरद्वारे पाणीपुरवठा करून शासनाचे कोट्यावधी रुपये खर्च केले जात आहेत. नांदूर मधमेश्वर कालवा परिसरामध्ये गंगापूर व वैजापूर शहरासह जवळपास 200 ते 250 गावे व अनेक वस्त्या वाड्या समाविष्ट आहेत या कालव्याला पिण्यासाठी पाण्याचे आवर्तन सोडून गावातील पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरी अवलंबून असलेले पाझर तलाव भरून घेतल्यास या भागातील सर्व गावातील पाणीटंचाई तात्पुरत्या स्वरूपात दूर होऊ शकते व या माध्यमातून शासनाचा टँकरद्वारे पाणी पुरवठ्यासाठी होणारा कोट्यावधी रुपयांचा खर्च वाचू शकतो. नांदूर मधमेश्वर धरण हे गंगापूर वैजापूर तालुक्यासाठी बांधलेले असल्यामुळे या धरणावर प्रथम अधिकार गंगापूर वैजापूर तालुक्याचा असताना प्रशासन नाशिक जिल्ह्यातील पुढाऱ्यांच्या दबावाला बळी पडून आमच्या भागातील ग्रामस्थांना पिण्यासाठी पाणी देण्यास टाळाटाळ करीत असल्याचा आरोप शेतकरी नेते वाल्मिक शिरसाठ यांनी केला आहे.नांदूर मधमेश्वर कालव्यातून पिण्यासाठी आवर्तन न सोडल्यास गंगापूर व वैजापूर सारख्या मोठ्या शहरांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे प्रशासनाला अशक्य होणार आहे.जूनच्या पहिल्या आठवड्यात पाऊस झाला तरी देखील विहिरींना पाणी उतरण्यासाठी किमान एक महिना तरी लागणार आहे याचाच अर्थ प्रशासनाला व ग्रामस्थांना अजून पुढील दोन महिने पाणीटंचाईला तोंड द्यावे लागणार आहे. व त्यामुळे पुढील काळात प्रशासनावर प्रचंड प्रमाणात ताण येणार आहे.

नांदूर मधमेश्वर कालव्याच्या माध्यमातून पिण्याच्या पाण्यासाठी तात्काळ आवर्तन सोडण्याची तरतूद करावी नसता नांदूर मधमेश्वर कालवा क्षेत्रातील सर्व ग्रामस्थ येणाऱ्या 13 मे रोजी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या मतदानावर जाहीर बहिष्कार टाकतील व यासाठी सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहील असा इशारा देण्यात आला आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com